पुढारी

# जागरूक सभासदांमुळेच प्रगती

## आनंद मेणसे : 'रवळनाथ'तर्फे सभासद प्रशिक्षण कार्यशाळा

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराजांनी सहकाराचा पाया घातला. यामुळे कोल्हापुरात सहकार चळवळ रुजली. या चळवळीत सभासद जागरुक असला तरच सोसायटी तसेच संस्थांची प्रगती होते. यासाठी सभासद प्रशिक्षित होणे ही काळाची गरज आहे, असे मत रवळनाथ सोसायटीच्या बेळगाव शाखेचे चेअरमन निवृत्त प्राचार्य आनंद मेणसे यांनी व्यक्त केले.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाकडून मिळालेल्या अनुदानातून रवळनाथ को-ऑप. हाऊसिंग फायनान्स सोसायटी आजरातर्फे येथील न्यू उदय भुवनच्या सभागृहात सभासद प्रशिक्षण कार्यशाळा झाली. यावेळी 'बहुराज्य सहकारी संस्था कायदा-२००२ नुसार सभासदांचे अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी' या विषयावर आनंद मेणसे बोलत होते.

सोसायटीचे संचालक प्रा. विजयकुमार घुगरे यांनी स्वागत केले. संस्थापक चेअरमन एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक करून सोसायटीच्या प्रगतीचा आढावा घेतला. मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर कायदेतज्ज्ञ ॲड. सागर खन्नूकर, सोसायटीचे संस्थापक चेअरमन एम. एल. चौगुले, बेळगाव शाखेचे सल्लागार व सिंडीकेट बँकेचे निवृत्त सहायक महाव्यवस्थापक सी. जी. मुनवळ्ळी आदी होते.




**बेळगाव : अभिजित जवळकर यांना सभासद प्रशिक्षण प्रमाणपत्र देताना आनंद मेणसे, ॲड. सागर खन्नूकर, एम. एल. चौगुले, सी. जी. मुनवळ्ळी, प्रा. विजयकुमार घुगरे.**

सभासदांचे अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी या विषयावर मुनवळ्ळी यांनी तर ॲड. सागर खन्नूकर यांनी कायदा आणि वसुली या विषयावर मार्गदर्शन केले.

अमर अकनोजी, रमेश माईनकर, आनंद पाटील, प्रा. डॉ. इराप्पा जरळी, प्रा. डॉ. सोनाप्पा गोरल, रोहित पोरवाल, प्रा. अरविंद मगदूम, लीना देशपांडे, वंदना मुनवळ्ळी, कीर्तीकुमार दोषी, सुनील लमाणी, शशिकांत नाईक व अन्य उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप देशपांडे यांनी केले. बेळगाव शाखा सल्लागार कृपा कुलकर्णी यांनी आभार मानले.

सकाळ




टिळकवाडी : बोलताना ॲड. सागर खन्नुकर. शेजारी प्राचार्य आनंद मेणसे, चिदंबर मुनवळ्ळी, एम. एल. चौगुले आदी.

# गरजेइतकेच कर्ज घ्या ; आणि हप्ते वेळेत भरा

## ॲड. खन्नूकर ; 'रवळनाथ'तर्फे प्रशिक्षण कार्यशाळा

टिळकवाडी, ता. १० : सभासदांनी संस्थेच्या प्रत्येक बैठकीला हजर राहून माहिती घ्यावी. तसेच तुम्ही काढलेले कर्ज वेळेत भरावे. कर्ज वेळेत न भरल्यास तुम्हाला कायदेशीर नोटीस येऊ शकते. त्यामुळे गरज असेल तितकेच कर्ज घ्या, अशी माहिती ॲड. सागर खन्नुकर यांनी दिली.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा (मल्टि-स्टेट) शाखा बेळगाव यांच्यातर्फे रविवारी (ता. ९) सभासद प्रशिक्षण कार्यशाळा हॉटेल न्यू उदय भवन येथे झाली. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर बेळगाव शाखेचे अध्यक्ष निवृत्त प्राचार्य आनंद मेणसे, बेळगाव शाखा सल्लागार चिदंबर मुनवळ्ळी, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून उद्घाटन करण्यात आले.

ॲड. खन्नुकर म्हणाले, ''कर्ज वेळेत भरले नाही तर काही वर्षानंतर कर्ज भरताना तुम्हाला अडचणी येऊ शकतात. तुमचा पगार वाढण्याची गती कमी असते. यामुळे हप्ते चुकल्यानंतर वसुलीसाठी तगादा लावला जाऊ शकतो. तीन ते चार हप्ते चुकल्यानंतर कायदेशीर कारवाईही केली जाते. चेक बाऊन्स झाल्यानंतर नोटिसा येतात. यासाठी वेळेत कर्जाचे हप्ते भरणे आवश्यक आहे.''

निवृत्त प्राचार्य मेणसे यांनी, भारतात सहकार चळवळ सुरु करण्यामागे अनेक कारणे आहेत. यामध्ये महत्वाचे म्हणजे सावकारी कर्जातून शेतकऱ्यांची सुटका करणे होय. शाहू महाराजांचा कोल्हापुरात सहकार चळवळ यशस्वी करण्यात वाटा आहे. सहकारासंबंधी शिकायचे असल्यास कोल्हापूरला रोल मॉडेल म्हणून पाहावे लागेल, असे सांगितले.

Belgaum, Belgaum-Today
11/01/2022 Page No. 3